महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ४० /२०२४ दि. १३/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १५/०३/२०२४ रोजी मा. श्री. राहुल गांधी, खासदार, कॉंग्रेस पक्ष यांचा भिवंडी शहरात दौरा नियोजित आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई/ठाणे/मानकोली कडुन जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वसई रोड मार्गे गुजरात कडे जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई ठाणे कडुन जुना ठाणे आग्रा रोडने अंजुरफाटा कडुन भिवंडी शहरात येणाऱ्या टी.एम.टी./एस.टी. सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी.चे प्रवासी सदर ठिकाणी उतरवतील व तेथुनच प्रवासी घेवुन परत जातील आणि हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) (अ) रांजनोली नाका कडुन भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, मध्यम व हलक्या वाहनांना (कार, रिक्षा, दुचाकी इ.) **रांजणोली नाका** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.
(ब) एस.टी./के.डी.एम.टी./टी.एम.टी. बसेसना **रांजणोली नाका** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सदरची जड, मध्यम व हलकी वाहने रांजणोली नाका येथे वळसा घेवुन मुंबई–नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथुन अंजुरफाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथुन ओवळी गांव, ताडाळी जकातनाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.
(ब) एस.टी./के.डी.एम.टी, टी.एम.टी. बसेस रांजणोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथुनच प्रवासी भरून इच्छित स्थळी जातील. तसेच इतर वाहने रांजणोली नाका येथुनच वळसा घेवुन परत जातील.

**प्रवेश बंद –** ४) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **पारोळफाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अंबाडी नाका येथुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईनने इच्छित स्थळी जातील. हलकी वाहने पारोल रोड, मीठपाडा, खोणीगाव मार्गे गाजेंगी हॉलकडुन शिवाजी चौक येथून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना **मेट्रो हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** हलकी वाहने पारोल रोड, मीठपाडा, खोणीगाव मार्गे गाजेंगी हॉलकडुन शिवाजी चौक येथून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी. बसेससह **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सदरची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवे वळण घेवुन पाईपलाईन मार्गे वाडा कडे व पुढे इच्छीत स्थळी जातील.
(ब) तसेच एस.टी. बसेस आपले प्रवासी चाविंद्रा जकात नाका येथे उतरवतील व तेथुनच प्रवासी घेवुन बस वळवुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ७) छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडुन वंजारपट्टी नाका मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची वाहने संतोष ज्युस सेंटर — टिळक चौक, केशरबाग नाका— धामणकर नाका वरून इच्छित स्थळी जातील.

**पार्किंग मनाई —** दि. १५/०३/२०२४ रोजी नदीनाका — वंजारपट्टी नाका — स्व. आनंद दिघे चौक — कल्याण नाका — आसबिबी मस्जिद — नवीवस्ती — पाईपलाईन परिसरात रस्त्याचे दोन्ही बाजूला कोणत्याही प्रकारचे वाहन पार्क करता येणार नाही.

सदर अधिसुचना दि. १५/०३/२०२४ रोजी दुपारी १२:०० ते १९:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :— समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

संबंधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.